# पुस्तक प्रदर्शन

साहित्य अकादमीच्या माध्यमातून राष्ट्रीय पुस्तक सप्ताहाच्या निमित्ताने १८ ते २७ नोव्हेंबर या कालावधीमध्ये २४ भारतीय भाषांमधील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शाचे उद्‌घाटन गुजराती साहित्यिक वर्षा अडालजा करतील. आज १८ नोव्हेंबर रोजी दुपारी ४.३० वाजता साहित्य अकादमीच्या सभागृहात, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग, दादर पूर्व येथे हा कार्यक्रम होईल. पुस्तकांवर २० ते ५० टक्क्यांची सवलत देण्यात येणार आहे.